PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Majha Navra Tujhi Bayko
Year: 2006

Song: Ye Na Janu Ye Na Jara Ye Gamtil
Lyricist: Machhindra More, Ashwini Shende

ये ना जानू
ये ना जरा ये गंमतीला
ये ना पोरी
ये ना जरा ये पिरतीला
ये ना जानू
ये ना जरा ये गंमतीला
ये ना पोरी
ये ना जरा ये पिरतीला
प्रेम करू भरून भरून
बघू नको अशी दूरून
मन येतं फिरून फिरून
भुंग्याच्या वेगात धिंगाणा घालीत
झिंगत झोंबत छम छमा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
हां धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा हां
नाय नाय चालायचं नाय
नाय नाय पटायचं नाय
नाय आता कटायचं नाय
चालायचं नाय पटायचं नाय
चाळे करू बंद हयाचे
हटायचं नाय

जीव तुझ्यासाठी हा तळमळतो
येऊ देना कीव
बघ मी हळहळतो
जीव तुझ्यासाठी हा तळमळतो
येऊ देना कीव
बघ मी हळहळतो
जातो असा जातो उडून
आणतो हे तारे खुडून
देतो तुझी चुनरी मढून
ये संगतीला
हां बघू नको अशी अडून
तुझ्यामधे गेलोय गडून
गंमत जाऊ दे घडून
ये गंमतीला
छेडली मी तार
आता छम छम छमा
धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा हां
नाय नाय चालायचं नाय
नाय नाय पटायचं नाय
नाय आता कटायचं नाय
चालायचं नाय पटायचं नाय
चाळे करू बंद हयाचे
हटायचं नाय

खुलू दे ना कळी गडे
गाली जरा हास
तुझ्यासाठी करीन राणी
सोन्याचा घास
खुलू दे ना कळी गडे

Literacy for a Billion

गाली जरा हास
तुझ्यासाठी करीन राणी
सोन्याचा घास
चायनिज चिकन करीन
सुरमई ताजी तळीन
वेज राणी तुपात घोळीन
ये पंक्तीला
फुलावानी तुला जपीन
कधी कधी डोकं चेपीन
तुझ्यासाठी असा खपीन
घे दिमतीला
तुझ्या माझ्या रेसिपीचा
घालूया झिम्मा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
ये ना जानू
ये ना जरा गंमतीला
ये ना राजा
ये ना जरा पिरतीला

ये ना जानू
ये ना जरा गंमतीला
ये ना राजा
ये ना जरा ये पिरतीला
प्रेम करू भरून भरून
बघू नको असा दूरून
मन येतं फिरून फिरून
भुंग्याच्या वेगात धिंगाणा घालीत
झिंगत झोंबत छम छमा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
आता धूमधूम धूमधूम
होऊ दे हंगामा
नाय नाय चालायचं नाय
काय म्हणे चालायचं नाय
नाय नाय पटायचं नाय
का बरं पटायचं नाय
नाय आता कटायचं नाय
कोण तुम्ही हटायचं नाय
चालेल पटेल हटेल कटेल
हाय कुणा तमा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*